| धाराशिव | वर्ष २६ वे | अंक ८४ वा | शुक्रवार दिनांक ०५ जून, २०२६ | पृष्ठे ६ | किंमत ०१ ₹ RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## क्राईम न्युज

### दोघांनी गाडीचे काच खाली करून गंठण चोरले

धाराशिव (प्रतिनिधी)- शहर पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी शाहनवाझ चॉंदमिया शेख, वय ५४ वर्षे, रा. अहमदनगर ता. जि. अहमदनगर हे दि. ०२.०६.२०२६ रोजी गोकर्ण पेट्रोलपंपच्या बाजूला आवारात आर्यन हॉटेलच्या समोरील परिसरात मोकळ्या जागेत धाराशिव येथे गाडी बंद करुन झोपले असताना गाडीचा आर्धा काच उघडा त्यातुन अज्ञात दोन व्यक्तीने हात घालुन फिर्यादीचे पत्नीचे गळ्यातील सोन्याचे मिनी गंठण १५ ग्रॅम वजनाचे जबरदस्तीने हिसकावुन नेले. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-शाहनवाझ शेख यांनी दि.०२.०६.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन धाराशिव शहर पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०४, ३०३(२), ३(५) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### शस्त्र कायद्यांतर्गत गुन्हा

धाराशिव (प्रतिनिधी)- धाराशिव शहर पोलीस ठाणे अंतर्गत दत्ता, अर्जुन रा. पापनास नगर पारधी पिडी धाराशिव ता. जि. धाराशिव यांनी दि.०२.०६.२०२६ रोजी भन्साळी मेडीकल समोर छत्रपती शिवाजी महाराज चौक धाराशिव येथे लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल असे लोखंडी कोयता हा विनापरवाना बेकायदेशीर रित्या स्वत:चे जवळ बाळगलेले धाराशिव शहर पोलीसांना मिळून आले. यावर पथकाने नमुद लोखंडी कोयता जप्त करुन फिर्यादी नामे-अशोक बाबासाहेब शेंडगे, पोलीस अमंलदार नेमणुक पोलीस ठाणे धाराशिव शहर यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन शस्त्र कायदा कलम- ४,२५ सह ३(५) भा.न्या.सं. अन्वये धाराशिव शहर पो. ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे

### १,४५,००० किंमतीच्या मनी-मंगळसुत्राची चोरी

उमरगा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी नामे-शांताबाई धनराज सोमवंशी, वय ८० वर्षे, रा. नारंगवाडी ता. उमरगा जि. धाराशिव यांचे, कविता गुळगे, रा.दुधनाळ यांचे, सुनंदा सोनटक्के, रा. बेंबळी यांचे, उज्वला गावडे, रा. पाचगाव ता. करविर जि. कोल्हापुर यांचे दि.०२.०६.२०२६ रोजी दुधनाळ बसस्थानक उमरगा येथे अज्ञात व्यक्तीने गर्दीचा फायदा घेवून २९ ग्रॅमचे मनी मंगळसुत्रे एकुण १,४५,००० किंमतीचा माल चोरुन नेला. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-शांताबाई सोमवंशी यांनी दि.०२.०६.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन उमरगा पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

### 'तडजोड शुल्क'वसुल

धाराशिव शहर वाहतुक शाखा व संबंधीत पोलीस ठाण्यांनी महत्त्वाच्या रस्त्यांवर दि.०२ जुन रोजी मोटार वाहन कायदा-नियम भंग प्रकरणी एकुण १४६ कारवाया करुन १,१५०० 'तडजोड शुल्क'वसुल केले आहे.

## अनैतिक देह व्यापार करणाऱ्या स्पावर छापा;पाच महिलांची सुटका

धाराशिव (प्रतिनिधी)- पोलीस अधीक्षक, धाराशिव श्रीमती रीतु खोखर व अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांच्या मार्गदर्शनाखाली, अमोल मोहिते (परि.पोलीस उपअधीक्षक) यांना प्राप्त झालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे धाराशिव शहरातील स्पा सेंटरवर दि. ०२/०६/२०२६ रोजी अनैतिक मानवी वाहतूक (प्रतिबंध) अधिनियम, १९५६ (झखढ-) अंतर्गत धडक कारवाई करण्यात आली.

सदर कारवाईमध्ये अमोल मोहिते (परिविक्षाधीन पोलीस उपअधीक्षक), पोलीस निरीक्षक एम. एन. शेळके(AHTU), पोलीस उपनिरीक्षक सोनटक्के, पोलीस अंमलदार माने, दूधभाते, कंदळे, नाईकवडी, किवंडे,केवके महिला पोलीस हवालदार पुरी, जाधव तसेच चालक यांनी सहभाग घेतला. सदर कारवाई दरम्यान पंटरचा वापर करून खात्री करण्यात आली आणि शासकीय पंचांसमक्ष छापा टाकून कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करण्यात आली.

कारवाईदरम्यान सदर स्पा सेंटरमध्ये व्यावसायिक लैंगिक शोषण (अनैतिक व्यापार) सुरू असल्याचे निदर्शनास आले. याप्रकरणी संबंधित व्यवस्थापक, चालक व इतर संबंधित आरोपींविरुद्ध अनैतिक मानवी वाहतूक (प्रतिबंध) अधिनियम, १९५६ मधील तरतुदीनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर कारवाईमध्ये एकूण ५ महिलांची सुटका (Rescue) करण्यात आली असून त्यांना पुढील कायदेशीर कार्यवाहीसाठी संबंधित प्राधिकरणाकडे पाठविण्यात येत आहे.

अवैध धंद्यांविरुद्ध विशेष मोहीम तीव्र धाराशिव जिल्ह्यातील अवैध धंद्यांचे समूळ उच्चाटन करण्यासाठी मा. पोलीस अधीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली सध्या विशेष मोहीम राबविण्यात येत असून, याची विशेष जबाबदारी पोलीस उपअधीक्षक श्री. अमोल मोहिते यांच्यावर सोपविण्यात आली आहे. याअंतर्गत बेकायदेशीर व अनैतिक कृत्यांवर कडक पाळत ठेवून तात्काळ कायदेशीर कारवाईचे आदेश देण्यात आले आहेत.

ही धडक मोहीम यापुढेही तीव्र गतीने सुरू राहील आणि अवैध व्यवसायांत सामील असलेल्या घटकांची गय केली जाणार नाही, असा सज्जड इशारा पोलीस अधीक्षक यांनी दिला आहे.

## पालखी मार्ग की गैरप्रकाराचा महामार्ग? दोन वर्षातच रस्त्याला तडे; जनतेच्या जीवाशी खेळ करणाऱ्यांवर कारवाई कधी?



कळंब ( रामेश्वर डोंगरे) कोट्यवधी रुपयांचा खर्च करून उभारलेले रस्ते जर अवघ्या एक-दोन वर्षांतच तडे जाऊन फुटू लागला, तर त्या कामाच्या गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह निर्माण होणे स्वाभाविक आहे. कळंब तालुक्यातील पंढरपूर-शेगाव पालखी मार्गावरील रस्त्याची झालेली दयनीय अवस्था पाहता, रस्ता बांधला की भ्रष्टाचार गैरप्रकारात झाकला? असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.

मांगवडगाव परिसरात या रस्त्याला मोठमोठे तडे गेले असून संपूर्ण रस्ता अक्षरशः फाटल्याचे चित्र समोर आले आहे. विशेष म्हणजे हा रस्ता फार जुना नसून काही वर्षांपूर्वीच मोठ्या गाजावाजात तयार करण्यात आला होता. मात्र आज त्याची अवस्था पाहून शासनाच्या निधीचा योग्य वापर झाला का, असा प्रश्न निर्माण झाला आहे.

पालखी मार्ग हा केवळ सामान्य वाहतुकीचा रस्ता नसून लाखो वारकऱ्यांच्या श्रद्धेशी जोडलेला मार्ग आहे. अशा महत्त्वाच्या मार्गावर दर्जाहीन काम झाल्याचे चित्र समोर येत असल्याने संबंधित गुत्तेदार, अभियंते आणि कामाची देखरेख करणाऱ्या अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करणे आवश्यक आहे.

स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, रस्त्याला पडलेल्या भेगांमुळे अपघातांचा धोका वाढला आहे. विशेषतः रात्रीच्या वेळी दुचाकीस्वार आणि चारचाकी वाहनचालकांसाठी हा रस्ता जीवघेणा ठरू शकतो. तरीही संबंधित विभागाकडून तातडीने दुरुस्ती किंवा सुरक्षा उपाययोजना करण्यात आल्याचे दिसत नाही.

जनतेच्या पैशातून उभारलेले प्रकल्प जर एवढ्या कमी कालावधीत निकामी होत असतील, तर त्या कामाची गॅरंटी कोण घेणार? काम पूर्ण झाल्यानंतर गुत्तेदारांची जबाबदारी संपते का? की गुणवत्तेची तपासणी करणारी यंत्रणाच झोपेत आहे? असे अनेक प्रश्न आता जनतेसमोर उभे राहिले आहेत. रस्त्याच्या कामाची उच्चस्तरीय चौकशी व्हावी. संबंधित गुत्तेदाराची ब्लॅकलिस्टमध्ये नोंद करावी. दोषी अधिकाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करावी. झालेल्या नुकसानीची भरपाई गुत्तेदाराकडून वसूल करावी. नागरिकांच्या सुरक्षेसाठी तातडीने दुरुस्ती करण्यात यावी.अशी मागणी जनतेतून होत आहे

## कोचिंग क्लासेसना परवानगी देते तरी कोण? लक्ष कोणाचे?

धाराशिव (शेख अंजुम)- धाराशिव आणि लातूर जिल्ह्यात कोचिंग क्लासेसचे जाळे दिवसेंदिवस वाढत आहे. लाखो रुपयांच्या फी, मोठमोठ्या जाहिराती, यशाचे दावे आणि विद्यार्थ्यांची गर्दी पाहता हा उद्योग आता कोट्यवधी रुपयांच्या उलाढालीपर्यंत पोहोचल्याची चर्चा आहे. मात्र या सर्व गोंधळात सर्वसामान्य पालक आणि विद्यार्थ्यांचा एकच सवाल आहे...

**कोचिंग क्लासेसना परवानगी देतं तरी कोण? लक्ष कोणाचे?**

एखादी शाळा सुरू करायची असेल तर शिक्षण विभागाची परवानगी लागते. महाविद्यालय सुरू करायचे असेल तर विद्यापीठ, शासन आणि विविध विभागांची मान्यता आवश्यक असते. खाजगी रुग्णालय सुरू करायचे असेल तर आरोग्य विभागाची परवानगी लागते. कारखाना सुरू करायचा असेल तर विविध शासकीय नियम आणि तपासण्या होतात. मग हजारो विद्यार्थ्यांच्या भविष्याशी संबंधित कोचिंग क्लासेसच्या बाबतीत नेमकी जबाबदारी कोणाची?

जिल्हा परिषद? शिक्षणाधिकारी? महानगरपालिका? नगर परिषद? जिल्हाधिकारी कार्यालय? की इतर कोणता विभाग? हा प्रश्न आजही अनुत्तरित असल्याचे चित्र दिसत आहे.

फीची नियमावली नाही, मग लाखोंची फी कशी?

विशेष म्हणजे अनेक कोचिंग क्लासेसमध्ये एकाच प्रकारच्या अभ्यासक्रमासाठी वेगवेगळी फी आकारली जाते.

कोठे २० हजार... कोठे ५० हजार... तर काही ठिकाणी लाख रुपयांपेक्षा जास्त फी... मात्र या फीचे निकष काय?

सरकारने कोणती कमाल मर्यादा निश्चित केली आहे का? विद्यार्थ्यांकडून आकारण्यात येणाऱ्या शुल्काची तपासणी कोण करते? याबाबत स्पष्ट माहिती सर्वसामान्य पालकांना मिळत नाही.

अनेक कोचिंग क्लासेस जाहिरातींमध्ये शेकडो विद्यार्थ्यांच्या यशाचे दावे करतात.

राज्यात प्रथम... १०० टक्के निकाल... हजारो अधिकारी घडवले...

मात्र या दाव्यांची पडताळणी कोण करतो? खरोखरच त्या विद्यार्थ्यांनी संबंधित क्लासमध्ये शिक्षण घेतले होते का?

प्रशासन फक्त बघ्याची भूमिका घेत आहे का

पालकांच्या खिशातून लाखो रुपये बाहेर जात आहेत. विद्यार्थ्यांवर प्रचंड मानसिक आणि आर्थिक ताण निर्माण होत आहे.

अशा परिस्थितीत प्रशासनाने केवळ बघ्याची भूमिका घेऊन चालणार आहे का? की कोचिंग क्लासेसची नोंदणी, फी संरचना, जाहिराती आणि आर्थिक व्यवहार याबाबत ठोस धोरण आणले जाणार आहे? हा प्रश्न आता सर्वसामान्य नागरिक विचारत आहेत.

जिल्ह्यातील सर्व कोचिंग क्लासेसची अधिकृत नोंदणी सक्तीची करावी. प्रत्येक क्लासने फी संरचना सार्वजनिक करावी.

विद्यार्थी आणि पालकांसाठी स्वतंत्र तक्रार निवारण कक्ष सुरू करावा.

फी वसुली आणि आर्थिक व्यवहारांचे नियमित लेखापरीक्षण करावे. अशी मागणी जनतेतून होत आहे. या बाबीकडे प्रशासनाने लक्ष देण्याची गरज आहे.

## जागतिक सायकल दिन २०२६ निमित्त 'संडे ऑन सायकल' अभियानांतर्गत ७ जून रोजी सायकल रॅली



धाराशिव (जिमाका) जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय धाराशिव, खो-खो खेलो इंडिया सेंटर व क्रीडा भारती यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक सायकल दिवस २०२६ निमित्त आयोजित संडे ऑन सायकल या अभियानांतर्गत सायकल रॅलीचे आयोजन धाराशिव येथे दि.७ जून २०२६ रोजी सकाळी ७ वाजता करण्यात आले आहे.या रॅलीमध्ये खेलो इंडिया सेंटर,क्रीडा भारती,श्रीपतराव भोसले हायस्कूल,छत्रपती शिवाजी विद्यालय येथील खेळाडू व विद्यार्थी सहभागी होणार आहेत.

संडे ऑन सायकलअभियानांतर्गत आयोजित या सायकल रॅलीत धाराशिव शहरातील युवक, युवती, खेळाडू तसेच नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन श्रीकांत हरनाळे, जिल्हा क्रीडा अधिकारी,धाराशिव यांनी केले आहे.

सायकल रॅलीचा मार्ग जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (DIET) येथून सुरू होऊन गरड हॉस्पिटलपासून उजवीकडे वळण घेऊन देशमुख हॉस्पिटल,एचडीएफसी बँक,महात्मा फुले चौक मार्गे श्री तुळजाभवानी जिल्हा स्टेडियम येथे रॅलीचा समारोप (विसर्जन) होणार आहे.

## ढोकीतील वीजपुरवठा सुरळीत करा, सब-स्टेशन क्षमता वाढवा; ॲड. अजित गुंड पाटील

धाराशिव तालुक्यातील ढोकी व परिसरातील गावांमध्ये वारंवार खंडित होणारा वीजपुरवठा तातडीने सुरळीत करावा, ढोकी येथील ३३ केव्ही सब-स्टेशनची क्षमता वाढवावी तसेच परिसरातील सौरऊर्जा प्रकल्प पूर्ण क्षमतेने कार्यान्वित करावा, अशी मागणी रुपामाता फाऊंडेशनचे सचिव ॲड. अजित गुंड पाटील यांनी कार्यकारी अभियंता, महावितरण,विभागीय कार्यालय धाराशिव यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, ढोकी येथे महावितरणची दोन ३३ केव्ही सब-स्टेशन्स असून त्यावर अनेक गावांचा वीजभार अवलंबून आहे. मात्र, दिवसभरात अनेक वेळा वीजपुरवठा खंडित होत असल्याने नागरिक, शेतकरी, व्यापारी व लघुउद्योजकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. शेतीपंप, पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, उद्योगधंदे तसेच विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कामांवर याचा विपरीत परिणाम होत असून आर्थिक नुकसानही सहन करावे लागत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

ढोकी परिसरातील सौरऊर्जा प्रकल्प पूर्ण क्षमतेने कार्यान्वित झाल्यास वीजपुरवठा अधिक सक्षम व स्थिर होण्यास मदत होईल. त्यामुळे संबंधित प्रकल्प तातडीने सुरू करण्यासाठी आवश्यक कार्यवाही करावी, अशी मागणीही करण्यात आली आहे.

तसेच दरवर्षी पावसाळ्यापूर्वी वीज वितरण व्यवस्था सक्षम करण्यासाठी महावितरणकडून विशेष निधी उपलब्ध करून दिला जातो. या निधीतून सब-स्टेशन, वीजवाहिन्या, रोहित्रे, झाडांच्या फांद्यांची छाटणी तसेच इतर आवश्यक देखभाल व दुरुस्तीची कामे तातडीने पूर्ण करण्यात यावीत, जेणेकरून पावसाळ्यात वारंवार होणारे वीज खंडितीचे प्रकार टाळता येतील, असे ॲड. अजित गुंड पाटील यांनी निवेदनात म्हटले आहे.

जनहिताचा विषय लक्षात घेऊन ढोकी व परिसरातील नागरिकांना अखंडित, सुरक्षित व गुणवत्तापूर्ण वीजपुरवठा उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासनाने तातडीने सकारात्मक कार्यवाही करावी, अशी मागणी रुपामाता फाऊंडेशनतर्फे करण्यात आली आहे.

या निवेदनाच्या प्रती मुख्यमंत्री तथा ऊर्जा मंत्री, महाराष्ट्र राज्य, अधीक्षक अभियंता महावितरण धाराशिव तसेच कार्यकारी अभियंता महावितरण धाराशिव यांनाही पाठविण्यात आल्या आहेत.

## लोकनेते कै. पवनराजे निंबाळकर यांच्या कार्यस्मृतींना उजाळा



धाराशिव (प्रतिनिधी)- कै. पवनराजे निंबाळकर साहेब यांच्या पुण्यतिथीनिमित्त पवनराजे कॉम्प्लेक्स,धाराशिव येथे राजेसाहेबांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले.

जनसामान्यांच्या मनात अढळ स्थान निर्माण करणाऱ्या राजेसाहेबांच्या कार्याची प्रेरणा आणि त्यांची लोकसेवेची विचारधारा आजही असंख्य कार्यकर्त्यांना दिशा देत आहे. त्यांच्या पवित्र स्मृतींस विनम्र अभिवादन.

यावेळी पांडुरंग तात्या कुंभार, नानासाहेब पाटील,आतिश भैय्या पाटील,काका शिनगारे, नगरसेवक नाना घाटगे,सुमित बागल,ओंकार नायगावकर, मा. नगरसेवक राणा बनसोडे, युवासेना जिल्हा संघटक अमित उंबरे,गणेश भाऊ शिंदे,भारत काका शिंदे,कलीम कुरेशी,दत्ता टेकाळे, कक्ष जिल्हा संघटक मोईन पठाण,मनोज तात्या पडवळ,सत्यजीत पडवळ,अजित बाकले विभाग प्रमुख ,संदीप गायकवाड,पृथ्वीराज भैय्या बाफना,नवज्योत शिंगाडे,पंकज स्वामी,करवर साहेब नगरसेवक ,अभिराज कदम युवा सेना शहरप्रमुख , नगरसेवक सिद्धेश्वर कोळी सर, राकेश कचरे, युवासेना उपजिल्हाप्रमुख निलेश शिंदे, प्रसाद राजेनिंबाळकर, गजानन नलावडे, निलेश शिंदे, प्रशांत जगताप, युवासेना उपतालुकाप्रमुख लखन देशमुख, अक्षय खळतकर, मोरे अक्षय, तसेच इतर मान्यवर उपस्थित होते.

# खव्यानंतर आता अन्न व औषध'कडून दुधाचे नमुने तपासणीसाठी केले जप्त:शहरातील क्रीम लाइन डेअरीच्या दुधाचे नमुने घेत पाठवले तपासणीसाठी

धाराशिव (शीला उंबरे-पेंढरकर)- जिल्ह्यात अन्नपदार्थांमधील भेसळ रोखण्यासाठी आणि नागरिकांच्या आरोग्याशी खेळणाऱ्यांना चाप लावण्यासाठी अन्न व औषध प्रशासन आता पूर्णपणे ''अलर्ट मोड''वर आले आहे. नुकतेच २७ मे रोजी कळंब तालुक्यातील येरमाळा येथून खव्याचे नमुने घेतल्यानंतर, आता धाराशिव शहरातील काहीं कंपनीच्या दुधाचे नमुनेही तपासणीसाठी घेण्यात आले आहेत. एफडीएचे नवनियुक्त आयुक्त तुकाराम मुंडे यांच्या धडक आदेशानंतर कारवाईचे सत्र सुरु आहे. आयएएस अधिकारी तुकाराम मुंडे यांनी अन्न व औषध प्रशासनाचा पदभार स्वीकारल्यापासूनच आपल्या शैलीत कामाचा धडाका लावला आहे. जास्तीत जास्त भेसळखोरांवर कारवाई करण्याचे थेट आदेश त्यांनी अधिकाऱ्यांना दिले आहेत. त्यांच्या याच आदेशानुसार बुधवारी राज्यभरात एकाच वेळी धडक तपासणी मोहीम राबवण्यात आली. या राज्यव्यापी कारवाईचा एक भाग म्हणून धाराशिव शहरातील क्रीम लाइन कंपनीच्या दुधाचे नमुने घेण्यात आले आहेत. हे नमुने पुढील रासायनिक विश्लेषणासाठी छत्रपती संभाजीनगरच्या विभागीय प्रयोगशाळेत पाठवण्यात आले आहेत. तत्पूर्वी, २७ मे रोजी प्रशासनाच्या पथकाने कळंब तालुक्यातील खव्यासाठी प्रसिद्ध असलेल्या येरमाळा येथे छापा टाकून खव्याचे दोन नमुने घेतले होते. हे नमुने छत्रपती संभाजीनगर येथील अत्याधुनिक प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठवण्यात आले आहेत.

येरमाळा येथून घेतलेले खव्याचे नमुने आणि धाराशिवमधील दुधाचे नमुने छत्रपती संभाजीनगरच्या विभागीय प्रयोगशाळेत पाठवण्यात आले आहेत. या अहवालात अन्न सुरक्षा आणि मानके कायदा २००६ च्या निकषांचे उल्लंघन झाल्याचे आढळल्यास व्यावसायिकांचा परवाना रद्द होऊ शकतो. तसेच थेट गुन्हे दाखल होऊ शकतात. त्यामुळे या अहवालामध्ये काय निष्पन्न होते, याकडे लक्ष लागले आहे. अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त म्हणून पदभार घेतल्यानंतर तुकाराम मुंडे यांनी भेसळीच्या बाबतीत ''झिरो टॉलरन्स'' धोरण अवलंबले आहे. नागरिकांच्या जिवाशी खेळणाऱ्या अन्नमाफियांचे कंबरडे मोडण्यासाठी त्यांनी राज्यभरातील अधिकाऱ्यांना कारवाईचे स्पष्ट आणि कडक टार्गेट दिले आहे. त्यांच्या या कार्यपद्धतीमुळे प्रशासनातील शिथिलता दूर झाली असून, कारवाईचा वेग लक्षणीयरीत्या वाढला आहे.

दूध आणि खव्यापाठोपाठ आता धाराशिव जिल्ह्यात आंबे, केळी, खाद्यतेल आणि विविध औषधांवरही प्रशासनाचे विशेष लक्ष राहणार आहे. सध्या आंब्याचा हंगाम सुरू असून, फळे लवकर पिकवण्यासाठी घातक रसायनांचा (कार्बाईड/इथेलिन) सर्रास वापर केला जातो. या कृत्रिमरित्या पिकवल्या जाणाऱ्या फळांचीही तपासणी होणार आहे.

# मोहन गुंडेराव गजभार यांचे निधन



धाराशिव (प्रतिनिधी)-मोहन गुंडेराव गजभार (वय ८० वर्षे) यांचे दि. ०३/०६/२०२६ रोजी सोलापूर येथील खासगी रुग्णालयात उपचारादरम्यान अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या निधनाने धाराशिव शहरात शोककळा पसरली आहे.

त्यांच्यावर सायंकाळी धाराशिव येथील कपिलधारा येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. अंत्यसंस्कारास नातेवाईक, आप्तेष्ट, मित्रपरिवार तसेच शहरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. मोहन गजभार यांच्या पश्चात पत्नी, तीन मुली, एक मुलगा, नातवंडे असा मोठा परिवार आहे. ते धाराशिव शहरातील समता सोसायटीचे माजी अध्यक्ष होते. समाजकारणात व स्थानिक पातळीवर त्यांच्या कार्याचा ठसा उमटलेला होता. जुन्या पिढीतील शिक्षक तुळशीदास वैद्य यांचे भाचे जावई होते, तर डॉ. कुलदीप गजभार यांचे वडील होत. त्यांच्या निधनाने शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातही हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. त्यांच्या कार्यकाळात समता सोसायटीच्या विकासकामांना गती मिळाली होती. शांत, संयमी आणि सर्वांशी आपुलकीने वागणारे व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांची ओळख होती.

# फूटपाथ, प्रवेश मार्गाबाबत तुळजापुरात दुकाने बंद ठेवून व्यापाऱ्यांचे आंदोलन:महाद्वारासह महाद्वार रोड, भवानी रोडवरील दुकाने ठेवली होती बंद



तुळजापूर (प्रतिनिधी)- तीन फूट फूटपाथ, पाच फूट सायवान व भाविकांना महाद्वारमार्गेच मंदिरात प्रवेश देण्यात यावा, आदी मागण्यांसाठी महाद्वार परिसरातील व्यापाऱ्यांनी बुधवारी (दि. ३) दुपारी अचानक दुकाने बंद करत आंदोलन पुकारले. महाद्वार परिसरासह महाद्वार रोड, भवानी रोडवरील व्यापाऱ्यांनी दुकाने बंद ठेवून आंदोलनात सहभाग नोंदवला.

एक फुट फुटपाथ व तीन फूट सायवानची परवानगी व्यापाऱ्यांना देण्यात आली आहे. दरम्यान व्यापाऱ्यांनी अचानक आंदोलन करत दुकाने बंद ठेवल्याने ऐन गर्दीचा कालावधीत भाविकांना गैरसोयीचा सामना करावा लागला. नगराध्यक्ष विनोद गंगणे यांचा यशस्वी मध्यस्थीनंतर व्यापाऱ्यांनी आंदोलन मागे घेतले आहे. या वेळी सर्व व्यापाऱ्यांनी मंदिर संस्थानचा प्रशासकीय कार्यालयासमोर धरणे दिले. व्यापाऱ्यांनी नगराध्यक्ष गंगणे, मंदिर संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी उपेंद्र तामोरे, व्यवस्थापक तहसीलदार माया माने, मुख्याधिकारी अजिंक्य रणदिवे यांची मंदिर कार्यालयात भेट घेत मागण्यांचे निवेदन देण्यात आले. निवेदनावर लक्ष्मीकांत साखरे, ऋषिकेश वऱ्हाडे, अमर त्रिकोणे, गुरुनाथ पाटील, कैलास मस्के, नाना शिरसट, संग्राम वऱ्हाडे, आदी ३०० व्यापाऱ्यांचा स्वाक्षरी आहेत. तुळजापुरात महाद्वार परिसरातील व्यापाऱ्यांनी दुकाने बंद ठेवून आंदोलनात सहभाग घेतला. फूटपाथची रुंदी, प्रवेश मार्गाबाबत प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी आंदोलन केले आहे.

नगराध्यक्ष गंगणे यांची यशस्वी मध्यस्थी आंदोलन स्थळी भेट घेत नगराध्यक्ष गंगणे यांनी व्यापाऱ्यांशी चर्चा केली व्यापाऱ्यांचा मागण्या सविस्तर ऐकून घेतल्या. या नंतर गंगणे यांनी तालुक्याचे आ. राणाजगजितसिंह पाटील यांचा शी दूरध्वनी करून संपर्क साधत चर्चा केली व एक फूट फुटपाथ, तीन फूट सायवान, सर्व व्यापाऱ्यांनी एक सारखेच सायवान मारणे आदी अटीवर तोडगा काढण्यात आला. व्यापाऱ्यांनी आंदोलन मागे घेतले.

अतिक्रमण मोहिमेचे स्वागत निवेदनात गेल्या अनेक वर्षांपासून अतिक्रमणाचा विळख्यात अडकलेले महाद्वार मोकळे केल्याबद्दल व्यापाऱ्यांनी नगराध्यक्ष गंगणे यांचे कौतुक करत अतिक्रमण हटाव मोहीम योग्य असल्याचे नमूद केले आहे. या पुढे हि पालिकेचा अतिक्रमण हटाव मोहिमेला सहकार्य करण्याचे आश्वासन व्यापाऱ्यांनी नगराध्यक्ष गंगणे यांना दिले.

# लातूर समाचार धाराशिव

## बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क

**9422472502**
**9175325708**
**9284321472**

# कानेगाव रस्त्यावरील पुलाजवळील पर्यायी मार्गासाठी टाकलेला मुरुम काढण्याचे काम सुरू



लोहारा (प्रतिनिधी)- लोहारा शहरालगत कानेगाव रस्त्यावर ओढ्यावरील पुलाचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर वाहतुकीसाठी वापरण्यात आलेल्या पर्यायी मार्गासाठी टाकलेला मुरूम व मातीचे ढिगारे अखेर काढण्यास सुरुवात करण्यात आली आहे. पुलाचे काम सुरू असताना कानेगावकडे जाणाऱ्या रस्त्यावर वाहतूक सुरळीत राहावी म्हणून ओढ्यातून पर्यायी मार्ग तयार करण्यात आला होता. या मार्गासाठी मोठ्या प्रमाणात मुरूम टाकण्यात आला होता. मात्र पुलाचे काम पूर्ण झाल्यानंतरही हा भराव ओढ्यातच तसाच पडून राहिल्याने पावसाळ्यात पाण्याचा नैसर्गिक प्रवाह अडण्याची शक्यता निर्माण झाली होती. यामुळे शेजारील शेतांमध्ये पाणी शिरून शेतीचे मोठे नुकसान होण्याचा धोका व्यक्त केला जात होता.

स्थानिक शेतकरी व नागरिकांनीही या प्रकाराकडे लक्ष वेधत पावसाळ्यापूर्वी ओढा मोकळा करण्याची मागणी केली होती. दरम्यान, पुलाजवळील ठिकाणी तीन ते चार मोठे मुरूमाचे ढिगारे देखील पडून होते. त्यामुळे ओढ्याच्या प्रवाहावर अडथळा निर्माण होत असल्याचे स्पष्ट झाले होते. यानंतर पीएमजीएसवाय विभागाचे उपअभियंता संजय विभूते यांनी संबंधित कंत्राटदाराला तातडीने भराव काढून पात्र खुले करण्याच्या सूचना दिल्या. त्यानुसार बुधवारी प्रत्यक्षात काम सुरू करण्यात आले असून ओढा मोकळा करण्याची प्रक्रिया वेगाने सुरू आहे. लवकरात लवकर संपूर्ण भराव हटवून नैसर्गिक प्रवाह पूर्ववत करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. लोहारा शहरालगत कानेगाव रस्त्यावर ओढ्यावरील पुलाचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर वाहतुकीसाठी तयार करण्यात आलेल्या पर्यायी मार्गासाठी मोठ्या प्रमाणात मुरूम टाकण्यात आला होता. मात्र काम पूर्ण झाल्यानंतरही हा भराव ओढ्यातच राहिल्याने पावसाळ्यात पाण्याचा प्रवाह अडून शेजारील शेतीत पाणी घुसण्याचा धोका निर्माण झाला होता.

# धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२९४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४०
२४) २४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४


## Name of Change Declaration

Here in this advertise i am declaring that i have change My Name which was : SAYYED ARFAT ATAURREMAN TO SAYYED ARFAT ATAUR REHMAN. Hence for this Declaration i will be known by this name and will use . in future the SAYYED ARFAT ATAUR REHMAN will used by my family husband /wife, children and relative.
OLD NAME :- SAYYED ARFAT ATAURREMAN.
NEW NAME:- SAYYED ARFAT ATAUR REHMAN.
Address :- 21/72,REHMAN MANZIL,CIVIL HOSPITAL ROAD,BEHIND NAGAR VACHNALAY, SANJA WES GALLI, OSMANABAD -413501
AADHAR NO.- 870582996515
Mob. No.-91755742177

## Name of Change Declaration

Here in this advertise i am declaring that i have change My Name which was : SAYYED SARFRAJ ALTAF TO SARFRAJ ALTAF SAYYED. Hence for this Declaration i will be known by this name and will use . in future the SARFRAJ ALTAF SAYYED will used by my family husband / wife, children and relative.
OLD NAME :- SAYYED SARFRAJ ALTAF.
NEW NAME:- SARFRAJ ALTAF SAYYED
Address :- SAMEER KIRANA STOERS, BEHIND ST STAND,SAMARTH NAGAR, OSMANABAD -413501
AADHAR NO.- 213802271524
Mob. No.-9175926958

## मध्य रेल्वे
### सोलापूर विभाग
### पाणी उपसा आणि गाळ काढण्याचे काम

डीआरएम (वर्क्स), मध्य रेल्वे, सोलापूर आणि मा. भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने, खालील कामासाठी प्रतिष्ठित संस्था/कंत्राटदारांकडून ई-निविदा आमंत्रित करण्यात येत आहेत: ई-निविदा सूचना क्र.: 02-2026-DEN-Tr; **कामाचे नाव:** DEN/T/SUR विभागांतर्गत, रेल्वे क्रॉसिंगच्या जागी उभारलेल्या रेल्वे अंडर ब्रिजेस मधून पावसाळ्यात साचलेल्या पाण्याचा उपसा करणे आणि सर्व RUBs मधील गाळ साफ करणे (कालावधी: १ वर्ष); कामाचा अंदाजित खर्च: रु. ३३,६२,५३४/-; अनामत रक्कम: रु. ६७,३००/-; काम पूर्ण करण्याचा कालावधी: १२ महिने; देखभालीचा कालावधी: काहीही नाही; निविदा अर्जाची किंमत: काहीही नाही; www.ireps.gov.in या संकेतस्थळावर निविदा सादर करण्याची तारीख आणि वेळ: २४.०६.२०२६ रोजी १५:०० वाजेपर्यंत; www.ireps.gov.in या संकेतस्थळावर निविदा उघडण्याची तारीख आणि वेळ: २४.०६.२०२६ रोजी १५:३० वाजल्यानंतर; संकेतस्थळाचा तपशील: www.ireps.gov.in; टीप: इच्छुक निविदाकारांना असा सल्ला देण्यात येतो की, निविदा बंद होण्याच्या अंतिम तारखेपूर्वी त्यांनी या निविदेसंदर्भात जारी केलेले कोणतेही बदल/शुद्धिपत्रक पाहण्यासाठी www.ireps.gov.in या संकेतस्थळाला वारंवार भेट द्यावी.

विभागीय रेल्वे व्यवस्थापक (कार्य)
मध्य रेल्वे, सोलापूर
DE/Sur-27

सुरक्षित प्रवास करा,
फूटबोर्डवरून प्रवास करणे टाळा.

## मध्य रेल्वे
### सोलापूर विभाग
### उच्च-पातळीवरील फलाटांची उभारणी

डीआरएम (कार्य), मध्य रेल्वे, सोलापूर आणि मा.भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने, खालील कामासाठी प्रतिष्ठित संस्था/कंत्राटदारांकडून ई-निविदा मागवण्यात येत आहेत: **ई-निविदा सूचना क्र.: 14-2026-SrDENCo.**; **कामाचे नाव:** १. हरंगुल (HGL) स्थानकावर (NSG-5) उच्च-पातळीवरील फलाटाची उभारणी. २. मुरुड (MRX), कळंब रोड (KMRD) आणि सेंद्री (SEI) स्थानकांवर उच्च-पातळीवरील फलाटांची उभारणी. **कामाचा अंदाजित खर्च:** रु. २०,२८,८७,४२२.०६; **अनामत रक्कम**: रु. ४०,५७,८००/-; **काम पूर्ण करण्याचा कालावधी:** १२ महिने; **देखभालीचा कालावधी:** २४ महिने; **निविदा अर्जाची किंमत:** शून्य; **www.ireps.gov.in** या **संकेतस्थळावर निविदा सादर करण्याची तारीख आणि वेळ:** २३.०६.२०२६ रोजी १५:०० वाजेपर्यंत; **www.ireps.gov.in** या **संकेतस्थळावर निविदा उघडण्याची तारीख आणि वेळ:** २३.०६.२०२६ रोजी १५:३० वाजल्यानंतर; **संकेतस्थळाचा तपशील: www.ireps.gov.in**; **टीप:** इच्छुक निविदाकारांना असा सल्ला देण्यात येतो की, निविदा बंद होण्याच्या अंतिम तारखेपूर्वी त्यांनी या निविदेसंदर्भात जारी केलेले कोणतेही बदल/शुद्धिपत्रक पाहण्यासाठी **www.ireps.gov.in** या संकेतस्थळाला वारंवार भेट द्यावी.

विभागीय रेल्वे व्यवस्थापक (कार्य)
मध्य रेल्वे, सोलापूर
DE/Sur-28

सुरक्षित प्रवास करा,
फूटबोर्डवरून प्रवास करणे टाळा.


सांज दैनिक लातूर समाचार हे मुद्रक,प्रकाशक,संपादक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर येथे छापून समर्थनगर धाराशिव येथे प्रकाशित केले आहे.

Evening Daily Latur Samachar is Published by Dayanand Shankar Jade from Samarth Nagar,Dharashiv on behalf of Dayanand Shankar Jade ,edited by Dayanand Shankar Jade and Printed by Dayanand Shankar Jade at Jade Offset Printers,Mitra Nagar,Latur. Editor : Dayanand Shankar Jade Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649